शोध पत्र- bfrgkl

e- xk/kh th o i- Jh/kj'kkL=h ;kP;krhy vLi';rfo"k;hp fopkjeFku

* ik- Mk- vfuy ekf.kdjko clk.k

* Z.B. Patil College, Dhule

प्रस्तावना :

पं. श्रीधरशास्त्री पाठक एक अभ्यासू, व्यासंगी आणि समाजसेवेची आंतरिक ओढ असलेले व्यक्तिमत्व होते. त्यांनी अभ्यासपूर्ण विचारातून, चिकित्सक आणि प्रभावशाली वक्तृत्वांतून सुदृढ मानव समाज उभा करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक पृष्ठभूमीवर सनातनी विचाराचे प्राबल्य होते. ह्या पार्श्वभूमीवर त्यांनी आपल्या विचार आणि कार्यातून समाजाला विधायक दिशा देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रत्येक कृतीतून आणि विचारातून केवळ समाजहित आणि प्राचीन वैदिक धर्मसंस्कृतीचे संवर्धन करण्याची भूमिकाच प्रतिबिंबीत होते. अस्पृश्यतेने ग्रासलेल्या समाजव्यवस्थेला आपल्या विचारातून त्यांनी आशेचा एक नवा किरण दिला. आपण मांडलेला विचार हा केवळ कागदावर न राहता, तो समाजमनापर्यंत पोहचला पाहिजे अशी त्यांची प्रामाणिक तळमळ होती. म्हणूनच त्यांच्या सामाजिक, धार्मिक कार्याचा अभ्यास करताना त्यांनी विविध सभा, संमेलनातून मांडलेली भूमिका, केलेले विचारमंथन अतिशय महत्त्वपूर्ण आहे. समाज व्यवस्थेला 'अस्पृश्यतेची' लागलेली कीड समाजव्यवस्था खिळखिळी करीत असल्याचे त्यांनी सप्रमाण सिद्ध केले.

समाजाकडून होणाऱ्या विरोधाला, टीका-टिप्पणींना दाद न देता आपले समाज प्रबोधनाचे कार्य त्यांनी अविरतपणे सुरू ठेवले. त्यांचे धर्मशास्त्रांवरचे सखोल अध्ययन झालेले असल्याने रूढीवादींच्या विरोधाची तमा न बाळगता निर्माण झालेल्या वादास त्यांनी सडेतोड उत्तर दिले. आपल्या प्राचीन वैदिक धर्मसंस्कृतीचा त्यांना नितांत आदर होता म्हणूनच त्यांनी आपल्या सामाजिक समतेच्या विचाराबरोबर धर्मसंस्कृतीचे संरक्षण आणि संवर्धन करण्याची जबाबदारी उचलली. अखिल जगाला आमच्या आदर्श संस्कृतीचे दर्शन त्यांनी विविध सभा संमेलनाच्या माध्यमातून करून दिले. त्यांनी मांडलेला प्रत्येक विचार हा अतिशय अर्थपूर्ण तसेच वजनदार असल्याने तो खोडून काढणे, कोणासही शक्य होत नसे. आपल्या सामाजिक-धार्मिक कार्याचा ठसा त्यांनी समाजमनावर अतिशय खोलवर उमटविला.

महात्मा गांधीजींशी अस्पृश्यतेविषयी विचारमंथन

हिंदूस्थानातील सामाजिक, धार्मिक आणि राजकीय स्थितीचा सूक्ष्म अभ्यास करून ब्रिटिशांनी एकसंघ हिंदुस्थान दुभंगण्याचा प्रयत्न केला. 'फोडा आणि झोडा' या नीतीचा अवलंब करू न हिंदू आणि मुस्लिम धर्मियांमध्ये मतभेद निर्माण केले. ब्रिटिशांनी वर्गीय, जातीय कलहाचे विष पेरून एकसंघ हिंदुस्थानी माणसांची मने विभाजीत केली. जात-धर्माच्या नावाखाली हिंदुस्थानातील माणसाच्या मनात विष पेरले गेले. जे धोरण हिंदु-मुस्लिम धर्मियांना एकमेकांपासून कायमचे दूर करण्यासाठी ब्रिटिशांनी वापरले तेच धोरण स्पृश्य-अस्पृश्याच्या बाबतीत वापरण्याचा ब्रिटिशांचा विचार होता. याच विचाराने इ. स. १९३२ मध्ये जातीय निवाड्याचा मसूदा तयार करण्यात आलेला होता. जातीय निवाड्याने आपल्या एकसंघ राष्ट्राचे अनेक सामाजिक व राजकीय विभाग होणार ही बाब गांधीजींच्या लक्षात आली. एकसंघ हिंदुस्थानात जातीय निवाड्याने भेदभावाचे, द्वेषाचे वातावरण निर्माण होईल असे त्यांना वाटत होते. या काळात गांधीजींना येरवड्याच्या तुरुंगात ठेवलेले होते. गांधीजीनी अस्पृश्यतेच्या प्रश्नावर विचारमंथन व्हावे या उद्देशाने 'हरिजन' आणि 'यंग इंडिया' ही हिंदी व इंग्रजी साप्ताहिके सुरू केली. गांधीजींचा अस्पृश्यतेला पूर्णपणे विरोध होता. अस्पृश्यतेच्या प्रश्नाने ते अतिशय बेचैन झालेले होते. गांधीजींनी येरवडा तुरुंगातच अस्पृश्यतेच्या प्रश्नावर उपोषण सुरू केलेले होते. अस्पृश्यता मानणे आणि पाळणे चुकीची आहे अशी सुधारणावादी विद्वानांची विचारसरणी होती. तर रूढीवादी मंडळीची पारंपरिक प्रथा आणि परंपरांचा आपण अंगीकार केला पाहिजे.

त्यात बदल करण्याचा आपणांस अधिकार नाही अशी भूमिका होती. अशा परस्परविरोधी विचारसरणीचा फायदा मात्र ब्रिटिश प्रशासन घेत होते. त्यातूनच त्यांनी जातीय निवाड्याचा मसूदा तयार केला. या प्रसंगाचे वर्णन पं. श्रीधरशास्त्रींचे शिष्य स्वामी रामानंद भारती यांनी अतिशय मार्मिक शब्दात केलेले आहे, ते म्हणतात,

जब पाश्चात्य रहा अनुशासन। भेद नीति से प्रजा को त्रासन
राजा हिंन्दु मुस्लिम भेदा। और अनेक रहे परिच्छेदा।।
छुवाछूत अरु जाति अनेका। रहे निरन्तर यह मत टेका।।
यह कानून बनत सुनि काना । गांधी हृदय अधिक दहलाना ।।
यदि यह नियम बद्ध होई जइ है। तौ पुनि भारत वर्ष नसइ है।।
रहे यरवदा कारावासी। तहॉ आमरण ढानि उपवासी ।।
सन उन्नीसौ तैतीस माहीं। आठ अप्रैल कीन्ह व्रत ताही।।
विद्वत सभा रही तेहि काळा। गांधी सुनेहू तहा अस हाला।।
जाति जन्मना कोई नाही। छुवाछुत सव कर्मज आही।।
त्रय सप्ताह बीति इमि गयेऊ । प्रण रिखि तव व्रत छोडत भयेऊ।।
श्रीधर पाठक शास्त्रीने, कीन्ह तहॉ व्याख्यान।
सहमत सबको करि लियो, जुडे बहुत विद्वान।।

म्हणजेच ब्रिटिशांच्या भेदनीतीच्या धोरणाने गांधीजी अस्वस्थ झालेले होते. त्यांना अस्पृश्यतेबाबत विद्ववानांची मते जाणून घ्यावयाची होती. अस्पृश्यतेच्या संदर्भात असलेली परस्परविरोधी विचारसरणी लक्षात घेऊन या बाबींची चिकित्सा करण्याच्या हेतूने गांधीजींनी दोन्ही बाजूची मते जाणून घेतली. अस्पृश्यतेला शास्त्रात स्थान नसल्याचे परिवर्तनवादी विचारसरणीच्या विद्वानांचे स्पष्ट मत होते. या गटात 'नागपूरचे के. ल. दप्तरी, सिद्धेश्वर शास्त्री चित्राव, श्रीधरशास्त्री पाठक, बाबू भगवानदास हे होते.' या शास्त्री पंडीतांनी अस्पृश्यतेला शास्त्रात कुठेही स्थान नसल्याचे सप्रमाण स्पष्ट केले. या बाबींचा सूक्ष्म अभ्यास करून 'द हिंदू' या नियतकालिकात म. गांधीजींनी आपली मते मांडलेली आहेत.

अस्पृश्यतेच्या संदर्भात विद्वानांची धर्मशास्त्रीय मते जाणून घेण्यासाठी गांधीजींनी २३ डिसेंबर १९३२ रोजी शास्त्री पंडीतांची एक परिषद घेतली. या परिषदेत त्यांनी शास्त्रात दिलेली अस्पृश्यतेची व्याख्या वर्तमानकाळात तथाकथीत अस्पृश्यांना लागू पडते काय? शास्त्राने अस्पृश्यावर कोणकोणती बंधने लादलेली आहेत. आपल्या जीवनात एखादी व्यक्ती अस्पृश्यतेपासून वेगळे असू शकते काय? शास्त्राने स्पृश्य आणि अस्पृश्य यांच्यामधील वर्तनाबाबत काय सूचीत केलेले आहे. शास्त्राने कोणत्या परिस्थितीत अस्पृश्यांना मंदिर प्रवेश मान्य केला आहे, शास्त्र म्हणजे काय, शास्त्राने कोणते अधिकार सिद्ध केलेले आहेत, शास्त्रानुसार अस्पृश्यतेची व्याख्या करताना कोणकोणते मते-मतांतरे घडण्याची शक्यता आहे, तुमचा स्वतःचा निष्कर्ष काय? इत्यादी बाबींवर सखोल चर्चा केली. गांधीजींनी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे पं. श्रीधरशास्त्री पाठकांनी आपल्या 'अस्पृश्यतेचा शास्त्रार्थ' या ग्रंथात सप्रमाण दिलेली आहेत. त्यांनी वेगवेगळ्या धर्मग्रंथाच्या आधारे अस्पृश्यतेला शास्त्रात स्थान नसल्याचे स्पष्ट केले. या आधारावरच म. गांधीजीनी ३ जानेवारी १९३३ च्या 'द हिंदु' या नियतकालिकात हिंदुधर्मशास्त्रानुसार अस्पृश्यता म्हणजे काय हे स्पष्ट करणारा लेख लिहिलेला आहे. यात गांधीजींनी हिंदुधर्मशास्त्रानुसार तीन प्रकारच्या व्यक्ती अस्पृश्य असतात असे मत मांडलेले आहे. त्यात जन्माने अस्पृश्य म्हणजे एखादा शूद्र पुरुष व ब्राह्मण स्त्री यांच्यापासून जन्मास आलेले 'अंत्यज' हिंदू धर्मशास्त्रात निषीद्ध असलेल्या पंच पापाचा अपराधी व्यक्ती, प्रदूषित अवस्थेतील व्यक्ती यांना अस्पृश्य संबोधले आहे. पहिल्या प्रकारात दर्शविल्याप्रमाणे आज कोणत्याही समाजात अशी अस्पृश्यता आढळून येत नाही. त्यामुळे हिंदुशास्त्रात नियंत्रित नियमानुसार 'अस्पृश्यता' ही संकल्पना समाजाला लागू पडत नाही. म्हणून धर्मशास्त्रावर अधिकार असणाऱ्या व्यक्तीकडून या बाबी जाणून घेण्याकरिता आचार्य आनंदशंकर धृव, डॉ. भगवानदास, स्वामी केवलानंद, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, नारायणशास्त्री मराठे, इंदीरारमण शास्त्री, पी.एच. परांजपे अशा विद्वानांची मोठी मदत झाल्याचे गांधीजीनी नमूद केलेले आहे. गांधीजीनी आपल्या या लेखात म्हटले आहे की, 'I have received valuable opinions in general support from Mahamahopadhyaya Pramathanatha Tarkabushan, Pundit Shreedhar Shastri Pathak' म्हणजेच अस्पृश्यतेविषयी धर्मशास्त्रीय जी मते उपलब्ध झाली त्यात महामहोपाध्याय प्रमथनाथ तर्कभूषण, पंडीत श्रीधरशास्त्री पाठक यांचे अतिशय मौल्यवान मत प्राप्त झाले असे गांधीजींनी म्हटलेले आहे. याच लेखात गांधीजी पुढे म्हणतात, 'The opinion of these learned men, popularly construed, means that no class of persons today bears the brand of permanent untouchability. It is obvios that untouchability by birth cannot exist today in connection with a class' म्हणजेच गांधीजींनी धर्मशास्त्राचा अभ्यास असलेल्या आचार्य आनंदशंकर, डॉ. भगवानदास, स्वामी केवलानंद, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पं. श्रीधरशास्त्री पाठकांसारख्या व्यक्तींची मते जाणून घेतली. त्यानंतर त्यांनी स्पष्ट केले की, विद्वानाच्या मते व्यक्तीचा अस्पृश्य असा ठसा असलेला कोणताही वर्ग आज समाजात नाही. तसेच हे सुद्धा स्पष्ट केले की, समाजात जन्मतः कोणीही अस्पृश्य नाही. गांधीजींच्या या विधानावरुन पं. श्रीधरशास्त्री हे खोटे सनातनी विद्वान नव्हते. समाजात समता प्रस्थापित व्हावी अशा आधुनिक विचारसरणीचे ते प्रकांड पंडीत, धर्मशास्त्रज्ञ होते असेच म्हणावे लागेल.

महात्मा गांधींनी परिवर्तनवादी पंडीताची शास्त्रीय दृष्टिकोनातून अस्पृश्यतेला कोठेही स्थान नाही हे मत जाणून घेण्याकरिता एक पत्रक काढलेले होते. 'श्रीधरशास्त्री धर्मपरिवर्तनवादी असून अस्पृश्यतेला शास्त्रात आधार नाही म्हणून महात्मा गांधीजींनी येरवडा तुरुंगातून काढलेल्या पत्रकाला त्यांची मान्यता होती.' अस्पृश्यतेविषयीचा स्पष्ट खुलासा पं. श्रीधरशास्त्रींनी केलेला दिसतो. 'हिंदू समाज व धर्मातील अस्पृश्यतेचा कलंक धुवून काढण्याकरिता महात्मा गांधी सारख्या नेत्यांना अस्पृश्यतेला शास्त्रात आधार नाही हे आपल्या ग्रंथाद्वारे दाखवून श्रीधरशास्त्री पाठक यांनी शास्त्रोक्त पाठिंबा देण्याचे सनातनी पंडीतांमध्ये क्वचितच दिसून येणारे महान धैर्य दाखविले.' श्रीधरशास्त्रींचा प्राचीन धर्मशास्त्राचा गाढा अभ्यास होता. प्राचीन वैदिक संस्कृतीवर, धर्मशास्त्रावर त्यांची नितांत निष्ठा होती. परंतु ही निष्ठा अंधपणाने न ठेवता डोळसपणे विचार करणारे पं. श्रीधरशास्त्री होते. त्यांची वैदिक संस्कृतीवर गाढ श्रद्धा होती. परंतु श्रद्धेचे रूपांतर त्यांनी अंधश्रद्धेत कधीच होऊ दिले नाही. प्राचीन धर्मशास्त्रांच्या आधारावर समाजहित साधले गेले पाहिजे या विचाराचे ते होते. धर्मशास्त्राचा उपयोग हा अस्पृश्यता निवारणाकरिता झाला पाहिजे या मताचे ते होते.

संदर्भ ग्रंथ

१. पाठक श्रीधरशास्त्री, ***नित्यब्रह्मकर्म समुच्चय,*** पुणे, १९२९.
२. पाठक श्रीधरशास्त्री, ***श्री. मधुसूदन सरस्वती विरचितः सिद्धांत तत्वबिंदू*** (मराठी अनुवाद), अमळनेर, १९४०.
३. काणे पांडुरंग वामन, ***धर्मशास्त्र विचार,*** मुंबई, १९३५.
४. काशीकर चिं. ग., ***वैदिक संस्कृतीचे पैलू,*** पुणे - १९७३.
५. कर्वे इरावती, ***धर्म,*** पुणे, १९७२.
६. खैर गजानन श्रीपत, ***गीतेतील मुख्य विचार,*** पुणे, १९७३.
७. जोशी लक्ष्मणशास्त्री, ***वैदिक संस्कृतीचा विकास,*** वाई, १९७२.
८. दप्तरी केशव लक्ष्मण, ***धर्मरहस्य,*** मुंबई, १९६५.
९. पटवर्धन चिं. ना., ***गीतामंथन,*** मुंबई, १९७६.
१०. भट यशवंत आबाजी, ***धर्मशास्त्राचा इतिहास (सारांशरुपग्रंथ),*** पूर्वाध, मुंबई, १९६७.
११. कीर धनंजय, ***महात्मा ज्योतीराव फुले,*** मुंबई, १८९४.
१२. साने गुरुजी, ***भारतीय संस्कृती,*** पुणे, २०००.